सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा - 2018

पेपर - II

**A** दि. 19 जानेवारी, 2019 **R12**

→ संच क्रमांक

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

**प्रश्नपुस्तिका**

**पेपर II**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग/मंत्रालय येथे चालणाऱ्या**

**कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती**

**वेळ : 1 (एक) तास** **एकूण प्रश्न : 100** **एकूण गुण : 100**

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

↑ केंद्राची संकेताक्षरे ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "ब" सोडविणे आवश्यक आहे. आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "क" सोडविणे आवश्यक आहे.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

## विभाग - अ

1. राज्यांच्या नियंत्रणाखालील सेवामध्ये अ.जा./अ.ज. प्रवर्गासाठी पदोन्नतीमध्ये आरक्षण देणेसंदर्भात तरतूद करणे या बाबीचा समावेश __________ मध्ये करण्यात आला आहे.

(1) मूलभूत हक्क
(2) राज्यधोरणाची निदेशक तत्वे
(3) मूलभूत कर्तव्ये
(4) वरीलपैकी एकही नाही

---

2. भारतीय संविधानामध्ये नमूद 'शोषणाविरुद्ध हक्क' यामध्ये पुढीलपैकी कोणत्या बाबी समाविष्ट होतात?

(अ) माणसांचा अपव्यापार
(ब) चौदा वर्षाखालील बालकास कारखान्यात कामास ठेवणे
(क) चौदा वर्षाखालील बालकास धोकादायक कामावर ठेवणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)
(2) फक्त (क)
(3) फक्त (ब) व (क)
(4) (अ), (ब) व (क) सर्व

---

3. भारताच्या संविधाना नुसार 'राज्य' या शब्दात पुढीलपैकी कशाचा समावेश होतो?

(अ) भारताचे सरकार व संसद
(ब) प्रत्येक राज्याचे शासन व विधानमंडळ
(क) भारत सरकारच्या नियंत्रणाखालील सर्व स्थानिक प्राधिकरणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (ब)
(2) फक्त (अ) व (ब)
(3) फक्त (अ)
(4) (अ), (ब) व (क) सर्व

---

4. समानतेचा हक्क या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहे/त?

(अ) धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरुन भेदभाव करण्यास मनाई केली आहे.
(ब) ज्या मागासवर्गाला राज्याच्या सेवामध्ये पर्याप्त प्रतिनिधी नाही अशा वर्गाकरिता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवता येऊ शकतात.
(क) स्त्रिया व बालके यांच्याकरिता विशेष तरतूद करता येते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व
(2) (अ) व (क)
(3) (अ) व (ब)
(4) एकही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

5. भारतीय संविधानातील कलम 12 अन्वये 'राज्य' या शब्दात भारताचे सरकार व संसद आणि राज्यांपैकी प्रत्येक राज्याचे शासन व विधानमंडळ आणि भारताच्या राज्यक्षेत्रातील अथवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील अन्य प्राधिकरणांसोबतच पुढीलपैकी कशाचा समावेश आहे?

(1) सर्व राज्ये (2) स्थानिक प्राधिकरणे

(3) केंद्र शासित प्रदेश (4) वरीलपैकी नाही

---

6. राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस परकीय देशाकडून किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही प्रकारची कोणतीही भेट, वित्तलब्धी किंवा पद स्वीकारण्यास कोणाची संमती लागते?

(1) केंद्र शासनाची (2) राज्य शासनाची (3) राष्ट्रपतींची (4) मुख्यमंत्र्यांची

---

7. औद्योगिक उपक्रम, आस्थापना किंवा अन्य संघटना यांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांना सहभागी करून घेणेबाबतची तरतूद घटनेच्या कोणत्या कलमाद्वारे करण्यात आली आहे?

(1) 13 अ (2) 23 ब (3) 33 ब (4) 43 क

---

8. कोणत्या कलमान्वये कामगारांना निर्वाह वेतन देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे?

(1) कलम - 16 (2) कलम - 14 (3) कलम - 24 (4) कलम - 43

---

9. पुढीलपैकी कोणते भारतीय संविधानात नमूद राज्य धोरणाचे निदेशक तत्व **नाही**?

(1) ग्रामपंचायतीचे संघटन

(2) सहकारी संस्थांचे प्रवर्तन

(3) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन

(4) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद यांचा विकास करणे

---

10. विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धता यापासून संरक्षण या संदर्भातील तरतुदी घटनेच्या कोणत्या कलमात अंतर्भूत आहेत?

(1) 20 (2) 21 (3) 22 (4) 23

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

11. राज्य घटनेतील कोणत्या कलमान्वये राज्याच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नागरिकांच्या ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व मिळालेले नाही अशा मागासवर्गाकरिता नियुक्त्या किंवा पदे राखून ठेवण्याचा अधिकार आहे?

(1) कलम 16 (1) (2) कलम 16 (3) (3) कलम 16 (2) (4) कलम 16 (4)

---

12. खालीलपैकी **चुकीची** जोडी ओळखा :

| **गट 'अ'** | | **गट 'ब'** |
|---|---|---|
| (अ) समानतेचा हक्क | ↔ | कलम 14 ते 18 |
| (ब) स्वातंत्र्याचा हक्क | ↔ | कलम 19 ते 22 |
| (क) शोषणाविरुद्धचा हक्क | ↔ | कलम 25 ते 28 |
| (ड) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क | ↔ | कलम 29 ते 31 |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) (2) (ब) (3) (क) (4) (ड)

---

13. खालीलपैकी 'राज्य धोरणाची निदेशक तत्वे' कोणती?

(अ) पुरुष व स्त्रिया यांना समान कामाबद्दल समान वेतन

(ब) पुरुष व स्त्रिया यांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान हक्क

(क) एकरूप नागरी संहिता

(ड) मादक पेये सेवनावर बंदी आणणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) एकही नाही (2) सर्व

(3) केवळ (अ) व (ब) (4) केवळ (क) व (ड)

---

14. खालीलपैकी कोणते मूलभूत कर्तव्ये **नाही**?

(1) बंधुभाव वाढीला लावणे (2) प्राणीमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे

(3) राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे (4) जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचावणे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

15. पर्यावरण, वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करण्याबाबत पुढीलपैकी कोठे तरतूद करण्यात आली आहे?
   (1) राज्य धोरणाची निदेशक तत्वे
   (2) मूलभूत कर्तव्ये
   (3) राज्य धोरणाची निदेशक तत्वे व मूलभूत कर्तव्ये या दोन्ही ठिकाणी
   (4) यापैकी कुठेही नाही

---

16. शोषणाविरुद्ध हक्क या तरतुदीअंतर्गत खालील कोणती विधाने **बरोबर** आहेत?
   (अ) माणसांचा अपव्यापार व वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे.
   (ब) सार्वजनिक सेवा करायला नागरिकास भाग पाडू शकते.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) केवळ विधान (अ) बरोबर असून विधान (ब) चूक आहे.
   (2) दोन्ही विधाने बरोबर आहेत.
   (3) दोन्ही विधाने चूक आहेत.
   (4) विधान (ब) बरोबर असून विधान (अ) चुकीचे आहे.

---

17. कोणत्या घटनादुरुस्तीने 'मालमत्तेचा हक्क' हा मूलभूत हक्कांमधून वगळण्यात आला?
   (1) 42 वी घटनादुरुस्ती    (2) 43 वी घटनादुरुस्ती
   (3) 44 वी घटनादुरुस्ती    (4) 45 वी घटनादुरुस्ती

---

18. सार्वजनिक सुव्यवस्था, नीतीमत्ता व आरोग्य यास अधीन राहून, प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्याच्यापैकी कोणत्याही गटास खालीलपैकी कोणत्या बाबी करता येतील?
   (अ) धार्मिक व धर्मादायी प्रयोजनांकरता संस्थांची स्थापना करून त्या स्वखर्चाने चालविणे.
   (ब) धार्मिक बाबींमध्ये आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहणे.
   (क) जंगम व स्थावर मालमत्ता मालकीची असण्याचा व संपादन करण्याचा अधिकार.
   (ड) कायद्यानुसार अशा मालमत्तेचे प्रशासन करण्याचा अधिकार.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (अ)    (2) फक्त (अ) व (क)
   (3) फक्त (ब) व (क)    (4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

19. कोणत्या कलमान्वये नागरिकांकरिता भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र एकरूप नागरी संहिता करण्यात आलेली आहे?

(1) कलम - 42 (2) कलम - 43 (3) कलम - 44 (4) कलम - 45

---

20. राज्य घटनेतील कलम 23 नुसार वेठबिगारी बरोबरच पुढीलपैकी कोणत्या बाबीस मनाई करण्यात आलेली आहे?

(1) माणसांचा अपव्यापार (2) माणसांची बेरोजगारी

(3) (1) व (2) दोन्ही (4) यापैकी नाही

---

21. भारतीय संविधानाच्या कोणत्या भागात राज्य धोरणाची निदेशक तत्वे देण्यात आली आहेत?

(1) भाग दोन (2) भाग तीन (3) भाग चार (4) भाग पाच

---

22. अल्पसंख्यांक असलेल्या वर्गाला खालीलपैकी कोणत्या निकषानुसार आपल्या पसंतीची शैक्षणिक संस्था स्थापण्याचा हक्क आहे?

(अ) धर्म (ब) भाषा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्ही (4) (अ) व (ब) यापैकी कोणतेही नाही

---

23. कोणत्या घटनादुरुस्ती अन्वये कलम 21 (क) नुसार सहा ते चौदा वर्षे वयाच्या सर्व बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे ?

(1) 86 वी (2) 85 वी (3) 84 वी (4) 91 वी

---

24. पुढीलपैकी राज्य धोरणाची निदेशक तत्वे कोणती?

(अ) जनतेचे पोषणमान व राहणीमान सुधारणे

(ब) प्रसूतिविषयक सहाय्यासाठी तरतूद करणे

(क) मादक पेयांच्या औषधी वापराखेरीज सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी प्रयत्न करणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (अ) व (ब)

(3) फक्त (अ) व (क) (4) (अ), (ब) व (क) सर्व

---

25. राज्यांना ग्रामपंचायत संघटीत करण्यासाठी व त्यांना स्वराज्याचे मूलघटक म्हणून कार्य करण्यास आवश्यक असे अधिकार व प्राधिकार बहाल करता येतात का?

(1) होय (2) नाही (3) आवश्यकतेनुसार (4) यापैकी नाही

26. पुढीलपैकी कोणत्या कृतींमुळे म.ना.से. (वर्तणूक) नियमाचा भंग होईल?

(अ) शासकीय कर्मचाऱ्याच्या मुलीच्या 5 व्या वाढदिवशी त्याच्या सासऱ्याने रुपये दहा हजाराची मुदतठेव (F.D.) मुलीच्या नावाने बँकेत केली.

(ब) शासकीय दौऱ्यावर असलेल्या वर्ग-1 च्या शासकीय अधिकाऱ्याने क्षेत्रीय कार्यालयाने सरकारी गेस्ट हाउस मध्ये राहण्याची व्यवस्था केली असतानाही ते मित्रांच्या अलिशान बंगल्यात मुक्कामी थांबले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्हीही (4) एकही नाही

27. शासन मान्यताप्राप्त संघटनेतील एखाद्या सदस्याला संघटनेचे लाभ केंव्हा मिळू शकतात?

(1) संघटनेची थकित वर्गणी दिल्यानंतर एक आठवड्यानंतर

(2) संघटनेची थकित वर्गणी दिल्यानंतरच्या दिवसापासून

(3) संघटनेचा सदस्य झाल्यापासून सहा महिन्याच्या कालावधीनंतर

(4) यापैकी नाही

28. पुढीलपैकी कोणती कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियमांचा भंग करणारी आहे?

(1) 'अ' या शासकीय कर्मचाऱ्याने भारतीय नागरिक नसणाऱ्या व्यक्तीशी विवाह केला.

(2) 'अ' या शासकीय कर्मचाऱ्याने कर्मचारी संघटनेची निवडणूक लढवली.

(3) सामान्य प्रशासन विभागातील 'क्ष' हे कक्ष अधिकारी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नोंदणीकृत सहकारी बँकेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य आहेत.

(4) 'ब' वर्ग कर्मचाऱ्याच्या निरोप समारंभासाठी 'ड' वर्ग कर्मचाऱ्याकडून वर्गणी वसूल करण्यात आली.

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

29. महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम, 1967 अन्वये पोलीस पाटील म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिंना म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील कोणते नियम लागू आहेत ?

(1) 1, 3, 5, 7, 9, 17, 15, 16
(2) 2, 3, 5, 6, 11, 15, 19, 29 व 30
(3) 4, 5, 6, 10
(4) एकही नाही

30. खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) शासनाच्या पूर्वमंजूरी शिवाय स्वत:च्या गौरवपर समारंभास हजर राहता येत नाही.
(2) शासनाच्या मंजूरी शिवाय कोणतेही प्रशस्तीपत्र स्विकारता येत नाही.
(3) शासनाच्या पूर्वमंजूरी शिवाय सार्वजनिक मंडळानी आयोजित केलेल्या कमी खर्चाच्या व साध्या मनोरंजनपर कार्यक्रमास उपस्थित राहता येते.
(4) राजपत्रित अधिकाऱ्याच्या निरोप समारंभासाठी कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांकडून वर्गणी वसूल करता येते.

31. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार कोणताही शासकीय कर्मचारी विहीत प्राधिकरणाला कळविल्या खेरीज स्थावर मालमत्ता खरेदी करू शकत नाही. याठिकाणी गट 'क' च्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत 'विहीत प्राधिकारी' म्हणजे –

(1) शासन
(2) विभाग प्रमुख
(3) कार्यालय प्रमुख
(4) कार्यासन प्रमुख

32. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील तरतुदीनुसार,

(अ) माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील शासकीय कर्मचारी एखाद्या व्यक्तिस माहिती देऊ शकतो.
(ब) शासकीय कर्मचारी कोणताही कार्यालयीन दस्ताऐवज त्याला प्राधिकृत केल्याखेरिज इतर शासकीय कर्मचाऱ्यास देऊ शकत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही विधाने योग्य आहेत.
(2) दोन्ही विधाने चुकीची आहेत.
(3) केवळ विधान (अ) योग्य आहे.
(4) केवळ विधान (ब) योग्य आहे.

33. गणपतराव उद्योग विभागात वर्ग-1 च्या पदावर कार्यरत असून त्यांचे अधिनस्त गरवारे कंपनीत त्यांच्या मुलाची स्वकर्तृत्वावर कनिष्ठ अभियंतापदी निवड झाली आहे.

(अ) स्वकर्तृत्वावर नोकरी मिळाल्याने शासनास कळविणे आवश्यक नाही.
(ब) सदर कंपनीत मुलाला नोकरीच करू देऊ नये.

वरीलपैकी **योग्य** नसलेला पर्याय कोणता ?

(1) फक्त (अ)
(2) फक्त (ब)
(3) (अ) व (ब) दोन्ही
(4) एकही नाही

34. शासकीय कर्मचारी असलेल्या अशोकला लिखाणाची खूपच आवड आहे. यासंदर्भात **योग्य** विधान निवडा :

(अ) लहान मुलांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी वृत्तपत्रात नियमित प्रकाशित करावयाच्या वैज्ञानिक सदरासाठी शासनाची मंजूरी घ्यावी लागेल.

(ब) वरील वैज्ञानिक सदरे ते टोपननावाने शासन मान्यतेशिवाय प्रकाशित करू शकतील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)
(2) फक्त (ब)
(3) (अ) व (ब) दोन्हीही
(4) एकही नाही

---

35. खालीलपैकी कोणती कृती ही म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार नियमभंग करणारी **नाही** ?

(1) तहसीलदार यांनी नोकरीच्या ठिकाणी शेतजमीन विकत घेतली आहे.
(2) उपजिल्हाधिकारी यांनी त्यांचे घरकाम करण्यासाठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थीनींना मानधनावर कामावर ठेवले आहे.
(3) कृषी विभागाच्या उपसचिवांनी शेतकरी सन्मान योजनेची माहिती दूरदर्शन कार्यक्रमातून दिली आहे.
(4) शालेय शिक्षण विभागातील अवर सचिवांनी स्वत:च्या मुलांना अनुदानित शाळेत शिक्षक पदावर नोकरीस ठेवले आहे.

---

36. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार,

(अ) शासनाच्या संमतीने साक्ष देत असताना शासनाच्या धोरणावर किंवा कोणत्याही कृतीवर शासकीय कर्मचारी टिका करू शकत नाही.

(ब) शासन आदेशानुसार होणाऱ्या विभागीय चौकशीच्या वेळी दिलेल्या साक्षीला वरील अट लागू नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ विधान (अ) योग्य आहे.
(2) केवळ विधान (ब) योग्य आहे.
(3) दोन्ही विधाने योग्य आहेत.
(4) दोन्ही विधाने चुकीची आहेत.

---

37. पुढीलपैकी कोणती कृती ही म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील तरतुदीस अनुसरून **नाही** ?

(1) शासकीय कर्मचाऱ्याने शासनाच्या पूर्वमान्यतेने स्वत: पुस्तक प्रकाशित केले.
(2) शासकीय कर्मचाऱ्याने राजकीय स्वरूपाचे स्वत:चे मालकीचे वृत्तपत्र सुरू केले.
(3) शासनाची पूर्वमान्यता न घेता शासकीय कर्मचाऱ्याने भारतीय नागरिक नसणाऱ्या व्यक्तीशी विवाह केला.
(4) यापैकी कोणतीही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

38. राकेश व त्याची पत्नी दोघेही सरकारी नोकरी करतात. त्यांनी स्वयंपाक व घर सफाईसाठी ठेवलेल्या नोकराणीला दोन वर्षाचा पगार अॅडव्हान्स मध्ये दिला याबाबत –

(अ) दोघांनीही शासनास कळवावे लागेल. (ब) केवळ एकाने शासनास कळविले तरी चालेल.

(क) शासनास कळविण्याची आवश्यकता नाही. (ड) शासनाच्या परवानगीने पगार देता येईल.

वरीलपैकी **अचूक** विधान कोणते ?

(1) (क) (2) (ड) (3) (अ) (4) (ब)

---

39. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार,

(अ) ज्याचा जीवनसाथी जिवंत आहे असा शासकीय कर्मचारी ज्याचा जीवनसाथी जिवंत आहे अशा व्यक्तिबरोबर विवाह करू शकणार नाही.

(ब) परंतु तसे करण्यास सबळ कारणे असतील व त्याबद्दल शासनाचे समाधान झाल्यास असा विवाह करता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही विधाने योग्य आहेत. (2) केवळ विधान (अ) योग्य आहे.

(3) केवळ विधान (ब) योग्य आहे. (4) दोन्ही विधाने चुकीची आहेत.

---

40. खालीलपैकी **चुकीचा** पर्याय ओळखा :

(अ) शासनाने नेमलेल्या चौकशी आयोगापुढे साक्ष देण्यासाठी महसूल विभागातील अधिकाऱ्यांना महसूल मंत्र्यांची परवानगी घ्यावी लागेल.

(ब) आय.पी.एस. अधिकाऱ्याच्या सुरू असलेल्या विभागीय चौकशीत साक्ष नोंदविण्यासाठी एखाद्या हवालदारास पोलीस महासंचालकांची परवानगी आवश्यक नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्हीही (4) एकही नाही

---

41. शासकीय कर्मचाऱ्यांची मान्यताप्राप्त संघटना विसर्जित करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या सभेला उपस्थित राहणाऱ्या मतदार सदस्यांची एकूण संख्या हि संघटनेच्या एकूण सदस्यसंख्येच्या ________ पेक्षा कमी असू नये.

(1) $\frac{1}{2}$ (2) $\frac{1}{4}$ (3) $\frac{2}{3}$ (4) $\frac{1}{3}$

---

42. विधाने लक्षात घ्या :

(अ) शासकीय कर्मचाऱ्याला नोकरीशी संबंधित बाबीसंदर्भात संपाचा अवलंब करता येणार नाही.

(ब) अमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यान्वये संप करण्यास स्पष्टपणे परवानगी दिली असल्यास त्याला संपात भाग घेता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (अ) योग्य असून विधान (ब) चुकीचे आहे.

(2) विधान (अ) चुकीचे असून विधान (ब) योग्य आहे.

(3) दोन्ही विधाने योग्य आहेत.

(4) दोन्ही विधाने चुकीची आहेत.

---

43. शासकीय कर्मचारी शासनाची पूर्वमंजूरी घेऊन पुढीलपैकी कोणत्या बाबी करू शकतो ?

(अ) धर्मादाय स्वरूपाचे मानसेवी काम

(ब) वाणिज्यिक प्रयोजनासाठी सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये भाग घेणे

(क) शेअरमध्ये गुंतवणूक करणे

(ड) खाजगी व्यक्तीकरिता त्याने केलेल्या कामासाठी फी स्विकारणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब) (2) फक्त (अ), (क) व (ड)

(3) फक्त (अ), (ब) व (ड) (4) (अ), (ब), (क) व (ड) सर्व

---

44. मत्ता व दायित्व विवरणपत्रामध्ये नमूद करावयाच्या 'जंगम मालमत्ता' या संज्ञेत पुढीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश होतो ?

(अ) जडजवाहीर (ब) वाहन

(क) कर्मचाऱ्याने काढलेली कर्जे (ड) रेफ्रिजरेटर

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ), (ब) व (क) (2) फक्त (ब), (क) व (ड)

(3) फक्त (अ), (ब) व (ड) (4) (अ), (ब), (क), (ड) सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

45. शासकीय औद्योगिकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एकाच वर्गाच्या जर दोन संघटनांनी मान्यतेसाठी अर्ज सादर केले तर संघटनेला मान्यता देण्याबाबत पुढीलपैकी कोणती कार्यवाही करण्यात येईल?

(1) प्रथम अर्ज सादर करणाऱ्या संघटनेस मान्यता देण्यात येईल.

(2) सदस्य संख्या अधिक असलेल्या संघटनेस मान्यता देण्यात येईल.

(3) दोन्ही संघटनेच्या सदस्यांची मिळून एकच संघटना करून त्यास मान्यता देण्यात येईल.

(4) दोन्ही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना आपापसात सल्ला-मसलत करून कोणत्याही एकाच संघटनेस अर्ज सादर करण्यास सूचित करण्यात येईल.

---

46. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियम 29 अन्वये मान्यता पाहिजे असणाऱ्या, शासकीय औद्योगिकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनेने आपला विहित नमून्यातील अर्ज कोणाकडे सादर केला पाहिजे?

(1) सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (2) कामगार विभागाचे सचिव

(3) संबंधित विभागाचे सचिव (4) वित्त विभागाचे सचिव

---

47. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील तरतुदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेला मान्यता देण्याकरिता पुढीलपैकी कोणत्या शर्तीची पूर्तता होणे आवश्यक आहे?

(अ) ज्या वर्गाचा समावेश असणारी संघटना आहे त्या वर्गाच्या प्रत्येक शासकीय औद्योगिकेतर कर्मचाऱ्यांना संघटनेचे सदस्यत्व खुले असले पाहीजे.

(ब) त्या वर्गातील शासकीय औद्योगिकेत्तर कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी किमान 35% कर्मचारी अशा संघटनेचे सदस्य असले पाहीजेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्ही (4) (अ) व (ब) यापैकी कोणतेही नाही

---

48. खालीलपैकी कोणते विधान **योग्य** आहे?

(1) शासकीय कर्मचारी राजकीय पक्षाच्या वर्तमानपत्रामध्ये राजकीय स्वरूपाचे लिखाण करू शकतो.

(2) शासकीय कर्मचारी राजकीय स्वरूपाचे लिखाण करणाऱ्या वृत्तपत्राचे व्यवस्थापन करू शकतो.

(3) शासकीय कर्मचारी शासकीय मंजूरीशिवाय साहित्यिक, कलात्मक लिखाण करू शकतो.

(4) स्वत:वर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी वर्तमानपत्रामधून लेख लिहू शकतो.

---

49. म.ना.से. (वर्तणूक) नियमांतील तरतुदीनुसार कामकरी महिलांच्या लैंगिक छळवादास प्रतिबंध या नियमाच्या उद्देशासाठी 'लैंगिक छळवाद' यामध्ये पुढीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश होतो ?

(अ) शारीरिक संपर्क (ब) अश्लिल साहित्याचे प्रदर्शन

(क) अशोभनीय शारीरिक, तोंडी आचरण (ड) अशोभनीय सांकेतिक आचरण

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (अ) व (क)

(3) फक्त (अ), (ब) व (क) (4) (अ), (ब), (क), (ड) सर्व

---

50. (अ) शासकीय कर्मचाऱ्याच्या पत्नीने स्त्रीधनाचे दागिने मोडून मारुती स्वीफ्ट कार विकत घेतल्यास याबाबत शासनास कळवावे लागेल.

(ब) म्हाडाच्या घराच्या लॉटरीसाठी अर्ज करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यास शासनाची परवानगी आवश्यक आहे.

वरीलपैकी **बरोबर** पर्याय ओळखा :

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्हीही (4) एकही नाही

---

51. पुढीलपैकी कोणत्या परिस्थितीत शासकीय कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक त्याला परत करण्यात येते ?

(1) सेवानिवृत्तीनंतर (2) राजीनामा दिल्यानंतर

(3) त्यास कार्यमुक्त केल्यानंतर (4) यापैकी कोणतेही नाही

---

52. पुढीलपैकी कोणती कृती ही म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 मधील तरतुदींस अनुसरुन **नाही** ?

(1) कार्यालय प्रमुखाने दरवर्षी त्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कर्मचाऱ्यांना त्यांची सेवापुस्तके दाखविण्यासाठी कार्यवाही केली.

(2) बदली झालेल्या कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक अद्ययावत करून कार्यालय प्रमुखाने ते सेवापुस्तक बदली झालेल्या कर्मचाऱ्यासोबत नवीन कार्यालय प्रमुखाकडे पाठविले.

(3) कार्यालय प्रमुखाने त्याच्या नियंत्रणाखालील कर्मचाऱ्यास जादा परिश्रमिकाशिवाय काम करण्यास सांगितले.

(4) शासकीय कर्मचाऱ्याला सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यभार स्विकारण्यास परवानगी देण्यात आली.

---

53. पुढील विधाने वाचून **योग्य** पर्याय निवडा :

(अ) सर्वसाधारणपणे कार्यमुक्त व कार्यमोचक शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यभार मुख्यालयाच्या ठिकाणी सुपूर्द केला जातो.

(ब) कोणत्याही परिस्थितीत शासकीय कर्मचाऱ्याला सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यभार स्विकारण्यास परवानगी देता येत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (अ) बरोबर, (ब) चूक
(2) विधान (अ) चूक, (ब) बरोबर
(3) दोन्ही विधाने बरोबर
(4) दोन्ही विधाने चूक

---

54. भारताच्या किंवा राज्याच्या एकत्रित निधीमध्ये कोणत्या प्रकारे प्राप्त निधीचा समावेश होईल?

(अ) प्राप्त झालेल्या महसुलाच्या सर्व रकमा
(ब) राजकोष पत्रांच्या विक्रीद्वारे उभारलेली सर्व कर्जे
(क) कर्जे
(ड) अर्थोपाय आगाऊ रकमा यांद्वारे जमा झालेला पैसा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब)
(2) (अ), (ब) व (ड)
(3) वरील सर्व
(4) (क) वगळता सर्व

---

55. वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेसाठी असमर्थ ठरविलेल्या व्यक्तीसंदर्भात खालील विधान **योग्य** आहे.

(1) वैद्यकीय प्रमाणपत्राच्या वैद्यतेचा कालावधी संपल्यावर त्यास पुनर्नियुक्ती देता येते.
(2) सार्वजनिक आरोग्य विभागातील सचिवांच्या तपासणी समितीने शिफारस केल्यास त्यास पुनर्नियुक्ती देता येते.
(3) वैद्यकीय समितीच्या प्रमाणपत्राशिवाय त्यास पुनर्नियुक्ती देता येत नाही.
(4) त्यास शासनसेवेत कधीही पुनर्नियुक्ती दिली जात नाही.

---

56. शासकीय कर्मचाऱ्याची नंतर कोणत्याही वरच्या पदावर नियुक्ती झाली तर खालील परिस्थितीत नव्याने वैद्यकीय तपासणी होणे आवश्यक **नाही**.

(1) वरच्या पदावरील नियुक्तीने गटबदल होणार नसेल तर.
(2) नवी नियुक्ती ही बढतीच्या क्रमानुसार आणि बढतीसाठी ठेवलेल्या प्रमाणशीर रिक्त पदावर झालेली असेल तर.
(3) सक्षम प्राधिकाऱ्याच्या मते वैद्यकीय तपासणी आवश्यक नसेल तर.
(4) अशा नव्या नियुक्तीच्या वेळी कर्मचाऱ्याने वयाची 45 वर्षे पूर्ण केली असली तर.

---

57. पोलीस शिपायाच्या सेवापटात कोणता तपशील असावा ?

(अ) नाव व नोंदणीची तारीख

(ब) धर्म, जात/जमात

(क) गांव

(ड) नाव नोंदणीच्या वेळची ओळखचिन्हे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब)

(2) (अ), (ब) व (ड)

(3) (अ), (क) व (ड)

(4) वरील सर्व

---

58. सेवेच्या सर्वसाधारण शर्तींमधील कुटुंबाच्या व्याख्येसंबंधी खाली तीन विधाने दिली आहेत. ती वाचून योग्य तो पर्याय निवडा.

(अ) कर्मचाऱ्याची पत्नी त्याच्यासोबत रहात नसली तरी तिचा कुटुंबात समावेश होतो, फक्त ती संपूर्णपणे त्याच्यावर अवलंबित असावी.

(ब) कर्मचाऱ्याची औरस व सावत्र मुले त्याच्यासोबत रहात असतील व संपूर्णपणे त्याच्यावर अवलंबून असतील तरच त्यांचा कुटुंबात समावेश होतो.

(क) कर्मचाऱ्याच्या आईवडिलांचा विनाअट त्याच्या कुटुंबात समावेश होतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत.

(2) (अ), (ब) आणि (क) चूक आहेत.

(3) फक्त (ब) बरोबर आहे.

(4) (अ) आणि (ब) बरोबर आहेत.

---

59. महिना व दिवस स्वरूपात कालावधी कसा मोजावा ?

(1) प्रथम दिवस नंतर महिने मोजावेत.

(2) प्रथम महिना व नंतर दिवस मोजावेत.

(3) संपूर्ण कॅलेंडर महिने मोजून उरलेले दिवस मोजावे.

(4) महिन्यातील एकूण दिवस मोजावेत.

---

60. वैद्यकीय तपासणीनंतर अपात्र ठरविल्यास, अंतिम निर्णय होईपर्यंत कोणत्या नियमान्वये सेवेमध्ये ठेऊन घेण्यात येईल ?

(1) परिशिष्ट तीन, नियम - 18

(2) परिशिष्ट तीन, नियम - 12

(3) परिशिष्ट तीन, नियम - 9

(4) परिशिष्ट तीन, नियम - 14

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

61. खालील विधानांचा विचार करा :

(अ) शासकीय कर्मचारी अकार्यक्षम असल्याने त्याची कमी वेतनाच्या पदावर बदली केली.

(ब) शासकीय कर्मचाऱ्याने लेखी विनंती केली नसताना त्याची कमी वेतनाच्या पदावर बदली केली.

यापैकी कोणते विधान **योग्य** आहे ?

(1) (अ) प्रमाणे कार्यवाही नियमांशी सुसंगत आहे व (ब) प्रमाणे कार्यवाही नियमांशी सुसंगत नाही.

(2) (अ) प्रमाणे कार्यवाही नियमांशी सुसंगत नाही व (ब) प्रमाणे कार्यवाही नियमांशी सुसंगत आहे.

(3) (अ) व (ब) दोन्ही कार्यवाही नियमांशी सुसंगत आहे.

(4) (अ) व (ब) दोन्ही कार्यवाही नियमांशी सुसंगत नाही.

---

62. कर्तव्यामध्ये खालीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश करण्यात येतो ?

(अ) परिविक्षाधीन म्हणून केलेली सेवा

(ब) पदग्रहण अवधी

(क) शासनाच्या आदेशाद्वारे किंवा त्याअन्वये प्राधिकृत केलेला निदेशन पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण पाठ्यक्रम

(ड) समाजकल्याण संचालक/शिक्षण संचालक/कृषी संचालक यांनी प्राधिकृत केलेला निदेशनाचा किंवा प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (क) (2) वरील सर्व (3) फक्त (ड) (4) फक्त (अ) व (ब)

---

63. प्रत्येक राजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याचे सेवाभिलेख __________ सुस्थितीत ठेवील.

(1) लेखापरीक्षा अधिकारी (2) विभागीय अधिकारी

(3) कार्यालय प्रमुख (4) विभाग प्रमुख

---

64. वैज्ञानिक व तांत्रिक संशोधन विषयक सेवेत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना पेटंट घेण्याबाबत कोणत्या अटी आहेत ?

(अ) प्रथमतः शासनाची परवानगी घ्यावी

(ब) शासनाने विहित केलेल्या अटीनुसार अर्ज करता येईल

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) व (ब) (4) यापैकी नाही

---

65. पहिल्या नियुक्तीची तारीख म्हणजे :

(अ) शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय सेवेमध्ये त्याच्या पहिल्या पदावरील कर्तव्यास प्रारंभ केल्याची तारीख

(ब) निवृत्ती वेतनासाठी सेवा म्हणून समजण्यात येणाऱ्या ज्या कोणत्याही कर्तव्यास त्याने प्रारंभ केला असेल ती तारीख

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) (2) फक्त (अ) (3) फक्त (ब) (4) वरीलपैकी एकही नाही

---

66. वाढीव जबाबदाऱ्यांसहित बढतीचे नवीन पद ग्रहण करावयाचे असेल तर, उच्चतर वेतन केव्हा अनुज्ञेय होईल?

(1) बढतीचे पद रिक्त झाले असेल तेव्हापासून.

(2) बढतीच्या पदावरील परिवीक्षा कालावधी संपल्यानंतर.

(3) बढतीच्या पदावर नियमित नियुक्ती झाल्यापासून.

(4) बढतीच्या पदाची कर्तव्ये स्वीकारली असतील तेव्हापासून.

---

67. प्रत्येक कार्यालयातील सेवापुस्तकांची पडताळणी किती कालावधीनंतर करणे आवश्यक असते?

(1) 6 महिन्यानी (2) प्रत्येक वर्षी (3) दोन वर्षांनी (4) 5 वर्षांनी

---

68. 'क्ष' या सहायक कक्ष अधिकाऱ्याने त्याच्या पदाचा कर्तव्यभार दि. 4 जुलै 2018 रोजी मध्यानोत्तर स्विकारला तर त्यास त्या पदाचे वेतन व भत्ते कोणत्या दिवसापासून मिळतील?

(1) दि. 4 जुलै 2018 पासून

(2) दि. 5 जुलै 2018 पासून

(3) (1) व (2) पैकी कर्मचाऱ्याने स्विकृत केलेल्या दिनांकापासून

(4) नियुक्ती प्राधिकारी ठरविल त्या दिनांकापासून

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

69. जर एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यास जन्माचे वर्ष व महिना माहीत आहे, पण नेमकी तारीख माहीत नाही तर त्या वेळी सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियम, 1981 मधील तरतुदीनुसार त्या कर्मचाऱ्याची जन्मतारीख कोणती मानण्यात येते?

(1) त्या महिन्याची 1 तारीख
(2) त्या महिन्याची 16 तारीख
(3) त्या महिन्याची शेवटची तारीख
(4) पुढील महिन्याची 1 तारीख

---

70. शासकीय सेवेत ठेऊन घेण्यास अपात्र असल्याबाबतचे, वैद्यकीय अधिकाऱ्याचे निष्कर्ष कळविण्यात आल्यापासून किती मुदतीत अपील दाखल करता येईल?

(1) पंधरा दिवस
(2) एक महिना
(3) तीन महिने
(4) वैद्यकीय प्रमाणपत्राच्या दिनांकापासून सहा महिने

---

71. खालीलपैकी कोणते विधान **चूक** आहे?

(अ) दीर्घ सुटी विभागातील शासकीय कर्मचाऱ्याने मुख्यालयाहून अन्य ठिकाणी पदाचा कार्यभार सोपविला.

(ब) विशेष परिस्थितीत शासकीय कर्मचाऱ्याने तारेने पदाचा कार्यभार सोपविला.

(क) रजेवर जाण्यापूर्वी शासकीय कर्मचाऱ्याने रजेच्या तारखेपासून कार्यभार सोपविण्याच्या प्रतिवेदनावर सही केली.

(ड) सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी शासकीय कर्मचाऱ्याने रोखपालांचा कार्यभार स्वीकारला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब)
(2) (ब) व (क)
(3) (क)
(4) (ड)

---

72. ज्याला वेतन किंवा रजावेतन मिळत नाही, अशा शासकीय कर्मचाऱ्याला दिली जाणारी मासिक रक्कम म्हणजे __________ होय.

(1) समयश्रेणी वेतन
(2) निर्वाह भत्ता
(3) संभाव्य वेतन
(4) विशेष वेतन

---

73. खालील विधान पूर्ण करा.

रजेनंतर ताबडतोब परीक्षा घेतल्यास _________.

(1) परीक्षेचा कालावधी कर्तव्यार्थ असेल

(2) परीक्षेच्या ठिकाणी जाण्याचा कालावधी कर्तव्यार्थ असेल

(3) तो रजेचा कालावधी समजण्यात येईल

(4) परीक्षा संपल्याच्या तारखेनंतर येणाऱ्या तारखेपासून रजा सुरू होईल

---

74. विकलांगता माफ करण्याचा अधिकार कोणास प्राप्त झाला आहे?

(1) वैद्यकीय अधिकारी
(2) जिल्हा शल्यचिकित्सक
(3) वैद्यकीय मंडळाचे प्रमुख
(4) संचालक, आरोग्य सेवा

---

75. समयश्रेणी समरूप आहेत असे केव्हा म्हटले जाईल?

(1) जर समयश्रेणीतील किमान वेतन, कमाल वेतन, वेतनवाढीचा कालावधी आणि वेतनवाढीचा दर हे सारखेच असतील तर

(2) जर समयश्रेणीतील किमान वेतन, कमाल वेतन सारखेच असतील तर

(3) जर समयश्रेणीतील वेतनवाढीचा कालावधी व वेतनवाढीचा दर सारखेच असतील तर

(4) यापेक्षा वेगळे उत्तर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

## विभाग – ब

**76.** सर्वसाधारणपणे राज्यपाल यांच्या सचिवांच्या कार्यालयाकडे पाठवावयाचे सर्व संदर्भ किमान कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्याच्या आदेशान्वये पाठविण्यात येतील?

(1) सचिव (2) उपसचिव (3) अवरसचिव (4) कक्ष अधिकारी

---

**77.** महाराष्ट्र शासन कार्यनियमावली अन्वये विहित केलेले नियम कोणत्या दिनांकापासून अंमलात आले?

(1) 1 मे, 1975 (2) 1 मे, 1960 (3) 1 एप्रिल, 1975 (4) 1 जुलै, 1975

---

**78.** मुख्य फाईल काही काळ उपलब्ध होणे शक्यच नसेल किंवा त्याच वेळी इतर विभागांशी विचारविनिमय करावयाचा असेल तेव्हा __________ फाईल उघडता येईल.

(1) नवीन फाईल (2) भाग फाईल (3) सुप्त फाईल (4) निवड फाईल

---

**79.** विधाने वाचून योग्य पर्याय निवडा –

(अ) अभिलेखांचे वर्गीकरण करण्यासाठी करण्यात येणारी 'अबकड सूची' प्रत्येक विभागाने विभागाच्या सचिवाकडून मान्य करून घ्यावी.

(ब) या सूचीचे दर पाच वर्षांनी पुनर्विलोकन करून ती अद्ययावत ठेवण्यात यावी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर, (ब) चूक (2) (अ) चूक, (ब) बरोबर

(3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

---

**80.** प्रकरणाचे प्राथम्यक्रम व ते निकालात काढावयाची कालमर्यादा याबाबत योग्य जोड्या लावा :

| **प्राथम्यक्रम** | **कालमर्यादा** |
|---|---|
| (अ) तात्काळ | (i) चार दिवसाच्या आत |
| (ब) तातडीचे | (ii) शक्यतोवर त्याच दिवशी |
| (क) सर्वसाधारण | (iii) एक आठवड्याच्या आत |
| | (iv) पंधरा दिवसाच्या आत |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) |
|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (ii) | (i) | (iii) |
| (3) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (ii) | (i) | (iv) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

81. अधिकाऱ्याने चर्चेसाठी कार्यालयाकडे पाठविलेली प्रकरणे किती कालावधीच्या आत चर्चेसाठी घेण्यात यावीत ?

(1) 24 तासाच्या आत (2) 48 तासाच्या आत

(3) 7 दिवसाच्या आत (4) 15 दिवसाच्या आत

82. विधानमंडळ सदस्यांना उपलब्ध असलेल्या पुढील आयुधांपैकी कोणत्या आयुधांचा वापर फक्त विधानसभा सदस्यांना करता येतो, विधानपरिषद सदस्यांना **नाही** ?

(अ) अल्प मुदतीचे प्रश्न (ब) अशासकीय ठराव

(क) बिनसरकारी विधेयके (ड) कपात प्रस्ताव

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ड) (3) फक्त (अ) व (ड) (4) यापैकी कोणतेही नाही

83. कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिकेनुसार खालीलपैकी कोणत्या आवकपत्रांची दैनंदिनीमध्ये नोंद करण्याची आवश्यकता आहे ?

(अ) मंत्रालयाचे इतर विभाग किंवा संलग्न कार्यालय यांच्याकडून आलेला सर्व पत्रव्यवहार

(ब) विभागाने एखादा कार्यालयीन आदेश काढला असल्यास त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेली इतर कोणत्याही प्रकारची आवकपत्रे

(क) ज्या पत्रांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे, अशा इतर कोणत्याही कार्यासनांकडून मिळालेले कार्यालयीन आदेश

(ड) तारांच्या टपाल प्रती

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ब) (2) (ब) आणि (क) (3) (ब) आणि (ड) (4) (अ) आणि (क)

84. साधारण राजपत्र कोणत्या दिवशी प्रसिद्ध करण्यात येते ?

(1) सोमवारी (2) मंगळवारी (3) गुरुवारी (4) शुक्रवारी

85. आठवड्यातील दिवसात उशीर पाळी लिपिक सायंकाळी किती वाजेपर्यंत कागदपत्रे स्विकारील ?

(1) 5.30 (2) 6.30 (3) 7.30 (4) 6.00

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

86. महाराष्ट्र शासन कार्यनियमावली नुसार मंत्रालयीन विभागाचा कार्यालय प्रमुख कोण असतो ?

(1) सचिव
(2) आस्थापना अधिकारी
(3) विभागाचे प्रभारी मंत्री
(4) विभागाचे राज्यमंत्री

---

87. प्रशासनातील बीम्स प्रणाली (BEAMS) कशाशी संबंधित आहे ?

(1) कार्यालयीन अभिलेखे अभिरक्षित करण्याची सुधारित पद्धती
(2) संगणकीय अर्थसंकल्पीय निधी वितरण व व्यवस्थापन प्रणाली
(3) नस्ती व्यवस्थापनाची नवी संगणकीय प्रणाली
(4) यापैकी नाही

---

88. महाराष्ट्र शासकीय गट 'अ' व गट 'ब' पदांवर पदोन्नतीने नियुक्ती करताना खालीलपैकी कोणत्या अधिकाऱ्यांना त्यांच्या सोयीचा महसुली विभाग वाटप करावा ?

(अ) स्वत: अपंग असलेले अधिकारी
(ब) विधवा किंवा परित्यक्त्या अधिकारी
(क) सेवानिवृत्तीस तीन वर्ष किंवा कमी कालावधी शिल्लक आहे
(ड) कुटुंबापासून लांब राहणारे अधिकारी

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व
(2) (अ), (ब) व (क)
(3) (अ) व (ब)
(4) (अ), (क) व (ड)

---

89. मंत्रालयात नस्ती क्रमांक देण्याचे काम विकेंद्रित करून कामाला गती देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या त्रिअक्षरी क्रमांक पद्धतीमध्ये लिहिण्यात आलेला 'रोहयो 1905/प्र.क्र. 40/रोह-4' पुढीलपैकी काय दर्शवितो ?

(अ) रोहयो ही तीन अक्षरे विभागाचे नाव दर्शवितात.
(ब) रोहयो ही तीन अक्षरे मुख्य विषय सूचित करतात.
(क) 1905 हा अंक अनुक्रमे उपविषय व नस्तीच्या सुरवातीचे वर्ष दर्शवितो.
(ड) 1905 हा अंक नस्तीच्या सुरवातीचे वर्ष दर्शवितो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) आणि (क) बरोबर
(2) फक्त (अ) आणि (ड) बरोबर
(3) फक्त (ब) आणि (क) बरोबर
(4) फक्त (ब) आणि (ड) बरोबर

---

**90.** शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी असलेल्या धोरणानुसार,

(अ) परिविक्षाधीन कालावधी सुरू असताना प्रतिनियुक्तीवर पाठविता येणार नाही.

(ब) गट 'अ' मधील अधिकाऱ्यास त्याच्या मूळ जिल्ह्यात प्रतिनियुक्तीवर पाठविता येणार नाही.

(क) संपूर्ण सेवेत 10 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर पाठविता येणार नाही.

(ड) गट 'ब' मधील (राजपत्रित) अधिकाऱ्यास त्याच्या मूळ तालुक्याव्यतिरिक्त इतर तालुक्यामध्ये प्रतिनियुक्तीवर पाठविता येणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व विधाने बरोबर आहेत.

(2) केवळ (अ) व (ब) विधाने बरोबर आहेत.

(3) केवळ (अ), (ब) व (क) विधाने बरोबर आहेत.

(4) सर्व विधाने चुकीची आहेत.

---

**91.** पुढीलपैकी कोणते कार्य हे अंदाज समितीच्या कार्यकक्षेत येत **नाही** ?

(1) अर्थसंकल्पीय अंदाजांची छाननी करणे.

(2) धोरणाशी सुसंगत असे काटकसरीचे उपाय सुचविणे.

(3) ताळेबंद व नफातोट्यांच्या लेख्यांची विवरणे तपासणे.

(4) अर्थसंकल्पाचा नमुना सुचविणे.

---

**92.** अंदाज समितीसंदर्भात पुढीलपैकी **योग्य** विधाने ओळखा -

(अ) महाराष्ट्र विधानसभा नियम 208 अन्वये अंदाज समितीची स्थापना करण्यात येते.

(ब) या समितीमध्ये जास्तीत जास्त 30 सदस्यांचा समावेश असतो.

(क) खर्चाच्या अंदाजांची तसेच झालेल्या खर्चाची तपशीलवार छाणणी करण्याचे काम सदर समिती करते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)  (2) फक्त (अ) व (ब)

(3) सर्व विधाने बरोबर आहेत  (4) सर्व विधाने चूक आहेत

---

**93.** विधानसभा अतारांकित प्रश्नाचे उत्तर किती कालावधित दिले पाहिजे ?

(1) 90 दिवसाच्या आत  (2) 30 दिवसाच्या आत  (3) 7 दिवसाच्या आत  (4) 24 तासात

---

**94.** महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील कोणत्या नियमानुसार विधानपरिषदेमध्ये अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यात येते ?

(1) नियम - 92  (2) नियम - 94  (3) नियम - 101  (4) नियम - 103

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

95. विधानमंडळ ठरावाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान **योग्य** आहे ?

(अ) जेव्हा एखादा ठराव मांडण्यात येऊन त्यावर मतदान झाले असेल तेव्हा तशाच आशयाचा प्रश्न उपस्थित करणारा कोणताही ठराव किंवा सुधारणा आधीच्या ठरावावर मतदान झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यानंतर मांडता येऊ शकेल.

(ब) जेव्हा सभागृहाच्या अनुमतीने एखादा ठराव मागे घेण्यात आला असेल तेव्हा तशाच आशयाचा प्रश्न उपस्थित करणारा ठराव अध्यक्ष/सभापतींच्या सहमतीने त्याच अधिवेशनात मांडता येऊ शकतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) योग्य
(2) फक्त (ब) योग्य
(3) दोन्ही विधाने योग्य आहेत
(4) दोन्ही विधाने अयोग्य आहेत

---

96. जेव्हा एकाच व्यक्तीस दोन किंवा अधिक राज्यांचा राज्यपाल म्हणून नियुक्त केले जाते तेव्हा राज्यपालास द्यावयाच्या वित्तलब्धी आणि भत्ते यांचा खर्च कसा केला जातो ?

(1) केंद्राच्या निधीतून
(2) केंद्र व राज्ये यांच्यामध्ये विभागून
(3) राज्यांमध्ये विभागून
(4) राज्यामध्ये चक्राकार पद्धतीने

---

97. मुख्यमंत्र्याची नियुक्ती कोणाकडून केली जाते ?

(1) राज्यपाल
(2) राष्ट्रपती
(3) मंत्रिमंडळ समिती
(4) मंत्रीपरीषद

---

98. भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदानुसार राज्य शासनाचे संपूर्ण शासकीय कामकाज राज्यपालांच्या नावाने करण्यात येते ?

(1) अनुच्छेद 164
(2) अनुच्छेद 165
(3) अनुच्छेद 166
(4) अनुच्छेद 167

---

99. राज्यपाल यांच्या कालावधी संदर्भात कोणते विधान/विधाने **चुकीची** आहेत ?

(अ) राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत
(ब) लेखी राजीनामा देईपर्यंत
(क) अधिकार पद ग्रहण केल्यापासून पाच वर्षे
(ड) उत्तराधिकारी अधिकार पद ग्रहण करेपर्यंत

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (क)
(2) (अ) व (ब)
(3) एकही नाही
(4) सर्व

---

100. लेखानुदाने, प्रत्ययानुदाने व अपवादात्मक अनुदाने कोणत्या कलमान्वये सादर केली जातात ?

(1) कलम 205
(2) कलम 206
(3) कलम 207
(4) कलम 208

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

## विभाग - क

76. खालीलपैकी भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदात उपबंधीत केलेल्या रितीने लोकसेवा आयोगाच्या सदस्यास पदावरून दूर करता येईल?

(1) अनुच्छेद 316 खंड 1 व 2
(2) अनुच्छेद 317 चा खंड 1 किंवा 3
(3) अनुच्छेद 318 चा खंड 'क'
(4) अनुच्छेद यापैकी नाही

---

77. संविधानाच्या अनुच्छेद 316 मध्ये पुढीलपैकी कोणती तरतूद करण्यात आली आहे?

(1) संघ राज्याकरिता व राज्यांकरिता लोकसेवा आयोगाची निर्मिती
(2) आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्या व पदावधी
(3) आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांना पदावरून दूर करणे व निलंबित करणे
(4) लोकसेवा आयोगाची कार्ये

---

78. राज्य लोकसेवा आयोगाचे कार्याधिकार विस्तारण्याची तरतूद संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदामध्ये करण्यात आली आहे?

(1) अनुच्छेद 321 (2) अनुच्छेद 322 (3) अनुच्छेद 319 (4) यापैकी एकही नाही

---

79. भारताच्या संविधानातील अनुच्छेद 315 मध्ये खालीलपैकी कोणत्या तरतूदी आहेत?

(अ) प्रत्येक राज्याकरिता एकेक लोकसेवा आयोग असेल.
(ब) दोन किंवा अधिक राज्ये करार करून त्या राज्याच्या समूहाकरिता एक लोकसेवा आयोग असेल.
(क) संघराज्याच्या लोकसेवा आयोगाला एखाद्या राज्याच्या राज्यपालाने तशी विनंती केली तर त्यास राज्यपालांची मान्यता घेऊन त्या राज्याची सर्व कामाची गरज भागविण्याचे कबूल करता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) (2) (अ), (ब) (3) (अ), (क) (4) सर्व

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

80. (अ) राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष फक्त संघ लोकसेवा आयोगाचा सदस्य म्हणून नियुक्ती होण्यास पात्र असेल.

(ब) राज्य लोकसेवा आयोगाचा सदस्य भारत सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही नोकरीस पात्र असेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर (ब) चूक  (2) (अ) चूक (ब) बरोबर
(3) दोन्ही चूक  (4) दोन्ही बरोबर

---

81. खालीलपैकी सरळसेवा भरतीकरीता मुलाखतीमधून शिफारशीसाठी विचार होण्यासाठी मागासवर्गीय उमेदवारांना मुलाखतीमध्ये किमान किती टक्के (%) गुण प्राप्त होणे आवश्यक आहे ?

(1) 35%  (2) 40%  (3) 41%  (4) 45%

---

82. आयोगाने नागरी सेवा मंडळ स्थापन करण्यासंदर्भात निर्गमित केलेल्या कार्यालयीन आदेश क्र. 5/2018, दि. 19 ऑक्टो. 2018 मध्ये 'नागरी सेवा मंडळ–1' मध्ये कोणत्या स्तरावरील कर्मचारी/अधिकारी यांच्या बदली, पदस्थापनेत बाबत समावेश आहे ?

(1) लिपिक टंकलेखक ते कक्ष अधिकारी  (2) कक्ष अधिकारी ते सह सचिव
(3) अवर सचिव ते सहसचिव  (4) यापैकी नाही

---

83. आयोगाचे स्थायी आदेश दि. 31 मे, 2016 नुसार, कोणत्या विभागाच्या शिक्षकीय पदांसाठी प्रतिक्षा यादीचा कालावधी 2 वर्षापर्यंत वाढविला आहे ?

(1) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग  (2) उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(3) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग  (4) वरील सर्व विभाग

---

84. शासन आदेश क्र. मलोआ - 1116/प्र.क्र. - 202/आठ, दि. 12 ऑक्टोबर, 2018 नुसार आयोगाच्या परीक्षा आयोजनाशी संबंधित खर्च करण्यास आयोगाचे सचिव मंजूरी देऊ शकतात, ती वित्तीय मर्यादा किती आहे ?

(1) ₹ 5 लाख प्रतिपरीक्षा  (2) ₹ 15 लाख प्रतिपरीक्षा
(3) ₹ 30 लाख प्रतिपरीक्षा  (4) ₹ 60 लाख प्रतिपरीक्षा

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

85. पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांना पात्र करताना विज्ञापित पदसंख्येच्या किती पट उमेदवार मिळतील, अशारितीने प्रथम गुणांची सीमारेषा ठरविण्यात येते?

(1) 10 पट (2) 15 पट (3) 16 पट (4) 12 पट

86. खालीलपैकी **अचूक** पर्याय निवडा :

(अ) राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आपल्या पदाचा राजीनामा देशाचे राष्ट्रपती यांच्याकडे सादर करतील.

(ब) राज्य लोकसेवा इतर सदस्य आपल्या पदाचा राजीनामा राज्याच्या राज्यपालांकडे सादर करतील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (अ) बरोबर, (ब) चूक (2) विधान (अ) चूक, (ब) बरोबर

(3) विधान (अ) व (ब) दोन्ही बरोबर (4) विधान (अ) व (ब) दोन्ही चूक

87. सहाव्या वेतन आयोगानुसार, आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांना अनुक्रमे कोणते वेतन देण्यात येते?

(1) ₹ 78,000 व ₹ 72,000 (2) ₹ 76,000 व ₹ 72,000

(3) ₹ 80,000 व ₹ 74,000 (4) ₹ 80,000 व ₹ 76,000

88. खालीलपैकी **अचूक** पर्याय निवडा :

(अ) राज्य लोकसेवा आयोगाचे सदस्य नियुक्ती स्विकारल्यापासून सहा वर्षे अथवा वयाची 62 वर्ष यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पद धारण करतील.

(ब) राज्य लोकसेवा आयोगाच्या सचिवांची नेमणूक राज्याच्या मुख्यमंत्र्याकडून आयोगाच्या अध्यक्षांशी विचार-विनिमय करून करण्यात येते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (अ) बरोबर व (ब) चूक (2) विधान (ब) बरोबर व (अ) चूक

(3) विधान (अ) व (ब) दोन्ही बरोबर (4) विधान (अ) व (ब) दोन्ही चूक

89. आयोगाच्या सदस्यांना कर्तव्यार्थ विमानाने प्रवास करावयाचा असल्यास कोणाची मंजूरी घ्यावी लागते?

(1) शासन (2) मा. अध्यक्ष

(3) मुख्य सचिव (4) यापैकी कोणाचीही नाही

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**90.** (अ) आयोगातील कक्ष अधिकारी (पूर्वीचे पदनाम अधीक्षक) हे लिपिक वर्गीय आस्थापनेतील पद आहे.

(ब) प्रस्तुत पदावरील व्यक्तीस शिक्षा लादू शकणारा प्राधिकारी आयोगाचा सचिव असतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही विधाने बरोबर (2) दोन्ही विधाने चूक

(3) फक्त (अ) विधान बरोबर (4) फक्त (ब) विधान बरोबर

---

**91.** आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षांमधून मुलाखतीकरिता बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांसाठी पर्सेंटाईलचे प्रमाण काय आहे?

(1) अमागास प्रवर्ग - 45%, मागास प्रवर्ग - 40%, खेळाडू/मा.सै./दिव्यांग - 30%

(2) अमागास प्रवर्ग - 35%, मागास प्रवर्ग - 30%, खेळाडू/मा.सै./दिव्यांग - 20%

(3) अमागास प्रवर्ग - 35%, मागास प्रवर्ग - 20%, खेळाडू/मा.सै./दिव्यांग - 15%

(4) वरीलपैकी एकही नाही

---

**92.** आयोगाच्या कार्यनियमावली मधील नियम 9 मध्ये कोणत्या बाबी समाविष्ट आहेत?

(1) सरळ सेवेद्वारे भरण्यात येणाऱ्या पदांच्या निवड प्रक्रियेचा तपशील

(2) स्पर्धा परीक्षेद्वारे भरण्यात येणाऱ्या पदांच्या निवड प्रक्रियेचा तपशील

(3) अध्यक्षांच्या कार्यकक्षेत येणारी प्रकरणे

(4) यापैकी नाही

---

**93.** आयोगाच्या कार्यनियमावली नुसार आयोगाची बैठक कधी आयोजित करण्यात येते?

(1) प्रत्येक महिन्यात एकदा (2) तीन महिन्यात एकदा

(3) प्रत्येक महिन्याच्या 1 ल्या आठवड्यात (4) दोन महिन्यात एकदा

---

**94.** आयोगाच्या कार्यनियमावली मधील कोणत्या नियमान्वये भरती संदर्भातील जाहिराती व अधिसूचना या बाबी अध्यक्षांच्या कार्यकक्षेत येतात?

(1) नियम 4 (2) नियम 5 (3) नियम 6 (4) नियम 7

---

95. आयोगाशी पत्रव्यवहार करताना अनुसरावयाच्या कार्यपद्धतीबाबतचे सर्वसमावेशक आदेश कोणत्या शासन निर्णय/परिपत्रकान्वये काढण्यात आले आहेत ?

(1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि. 5 जून 2018

(2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि. 5 जुलै 2018

(3) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दि. 5 जून 2018

(4) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दि. 5 जुलै 2018

---

96. आयोगाकडून तयार करण्यात आलेला ऐतिहासिक अभिलेख राज्यपालांकडे सादर करण्याबाबतची तरतूद संविधानातील अनुच्छेदा द्वारे करण्यात आली आहे :

(1) अनुच्छेद 321

(2) अनुच्छेद 322

(3) अनुच्छेद 323

(4) विशिष्ट तरतूद केलेली नाही

---

97. शा.नि.क्र. राक्रीधो – 2002/प्र.क्र. 68/क्रीयुसे – 2, दि. 1 जुलै, 2016 नुसार आयोगाच्या स्पर्धा परीक्षांसाठी खेळाडू पडताळणी प्रमाणपत्र कोणत्या दिनांकास प्राप्त असणे आवश्यक आहे ?

(1) पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक

(2) मुख्य परीक्षेस अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक

(3) मुलाखतीच्या वेळी प्रमाणपत्र पडताळणीचा दिनांक

(4) यापैकी नाही

---

98. खालीलपैकी अचूक पर्याय निवडा :

(अ) आयोगाच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल तयार करतांना दरवर्षी दि. 1 एप्रिल ते 31 मार्च हा कालावधी विचारात घेण्यात येतो.

(ब) आयोगाने दिलेल्या सल्ल्यानुसार कार्यवाही करणे शासनास बंधनकारक आहे.

(क) आयोगाचा सल्ला शासनाने स्विकारला नाही अशा प्रकरणाबाबतचा अहवाल राज्यपालांना सादर करणे आयोगास अनिवार्य असेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब)

(2) (अ), (क)

(3) (अ), (ब), (क)

(4) फक्त (ब)

---

**99.** उन्नत व प्रगत व्यक्ती/गट याकरिता नॉन क्रिमीलेअर ची उत्पन्न मर्यादा सध्या किती व कोणत्या शासन निर्णयानुसार ?

(1) सहा लाख, 13 सप्टेंबर 2016
(2) सात लाख, 20 नोव्हेंबर 2017
(3) आठ लाख, 16 डिसेंबर 2017
(4) दहा लाख, 05 मे 2018

---

**100.** आयोगाने प्रसिद्ध केलेल्या एका स्पर्धा परीक्षेच्या जाहिरातीत पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत असे टप्पे आहेत. तर उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता कोणत्या दिनांकापर्यंत धारण करणे आवश्यक आहे ?

(1) जाहिरात प्रसिद्ध झाली त्या दिनांकापर्यंत
(2) जाहिरातीनुसार पूर्व परीक्षेचा अर्ज स्विकारण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत
(3) मुख्य परीक्षेच्यां, परीक्षेच्या दिनांकापर्यंत
(4) मुख्य परीक्षेचा अर्ज स्विकारण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) राजा राममोहन रॉय'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल, यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्रं. 201 समोरील उत्तर-क्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

SEAL